महाराष्ट्र शासन
मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प
(जागतिक बँक सहाय्यित उपक्रम)

जा.क्र/स्मार्ट/स.प्र.अ/FAQ/११२१/२०२१ दि.१२/१२/२०२१

प्रति,

नोडल अधिकारी ,
प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषि, एमएसआरएलएम, माविम, व्हीएसटीएफ

विषयः- स्मार्ट प्रकल्पांतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना वारंवार विचारले जाणाऱ्या प्रश्नबाबत.

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत प्राथमिक मान्यता दिलेल्या समुदाय आधारित संस्थांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम क्षेत्रीयस्तरावर सुरू आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना वारंवार विचारले जाणारे प्रश्न व उत्तरे खालीलप्रमाणे.

प्रश्नः- १) समुदाय आधारित संस्थेने ऑनलाइन अर्ज करतेवेळी वेगळे घटक प्रस्तावित केले होते, परंतु प्रकल्प अहवाल तयार करताना पीक, खरेदीदार व घटक यामध्ये बदल करता येईल?

उत्तरः- समुदाय आधारित संस्थेने ऑनलाइन अर्ज करतेवेळी जरी वेगळे घटक प्रस्तावित केले असतील तरी प्रकल्प अहवाल तयार करताना पीक, खरेदीदार व घटक यामध्ये बदल करता येईल. परंतु सीबीओच्या कार्यक्षेत्रात सभासदांनी प्रकल्पासाठी निवडलेली पिके येत असावी आणि त्यासंबंधित खरेदीदारा सोबतच्या सामंजस्य करारात पिकाचा समावेश असावा.

प्रश्नः-२) सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूरीसाठी सादर करण्यास मुदतवाढ मिळणार आहे का?

उत्तरः- होय, प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांकडून मागणी आल्यास विचार होवू शकतो. तथापि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्याने लक्षांकानुसार प्रकल्प मंजूर केले जातील.

प्रश्नः-३) उपप्रकल्पासाठी निवडलेली जागा NA आवश्यक आहे का?

उत्तरः- स्मार्ट प्रकल्पास जागा NA ची आवश्यकता नाही, परंतु जर लाभार्थी सीबीओ ही कर्ज घेणार असल्यास बँका NA ची अट ठेवतात. उद्योग विभागाच्या शासन निर्णय क्र.कृराधो-१४१७/ प्र.क्र.१०९/९-अे दिनांक ०६, जून २०१८ नुसार NA बाबत दिलेली सूट बँकांच्या लक्षात आणून द्यावी. (सोबत शासन निर्णय)

प्रश्न:-४) उपप्रकल्पासाठी लागणाऱ्या जागेच्या नोंदणीकृत भाडेपट्टा कराराचे नोंदणी शुल्क खर्च सविस्तर अहवालामध्ये अंतर्भूत करता येईल का?

उत्तर:- होय, सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये ५% कार्यान्वयीन खर्चासाठी मिळणाऱ्या अनुदानातून खर्च करण्यात येईल. यामध्ये जागेच्या नोंदणीकृत दीर्घ कालावधीच्या (किमान २९ वर्ष) भाडेपट्टा कराराचे शासकीय नोंदणी शुल्क खर्चाच्या ६०% अनुदान (कार्यान्वयीन खर्चासाठी अनुज्ञेय मर्यादेत राहून) उपप्रकल्प मंजूर झाल्यानंतर सीबीओस देय राहील.

प्रश्न:-५) सीबीओचे भागधारक वाढवताना जिल्हा, तालुका किंवा राज्य अशी अट आहे का?

उत्तर:- नाही, परंतु शक्यतो एका गावातील किंवा शेजारील गावातील भागधारक असावेत, कारण ठराविक परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतमालाचे एकत्रिकरण करून विक्री करणे सोयीचे होईल आणि मूल्यसाखळी विकसित करता येईल व प्रकल्प तांत्रिक व आर्थिक निकषावर पात्र ठरेल.

प्रश्न:-६) सीबीओचे कार्यालय सोडून इतर ठिकाणी प्रकल्प उभा करता येईल का?

उत्तर:- होय, कार्यालय व सभासदांचे कार्यक्षेत्र एक असणे योग्य, प्रकल्पाची व्यवहार्यता तपासताना याबाबीचा विचार होईल.

प्रश्न:-७) उपप्रकल्पासाठी अनुदानाचा दर व अधिकतम मर्यादा काय आहे?

उत्तर :- फलोत्पादन पिकांच्या मुल्यसाखळी उपप्रकल्पासाठी प्रति समुदाय आधारीत संस्था, अनुदान मर्यादा एकुण प्रकल्प किंमतीच्या ६०% व अधिकतम रु. ३.०० कोटी असेल. तसेच अन्य शेत पिकांच्या मुल्यसाखळी उपप्रकल्पासाठी प्रति समुदाय आधारीत संस्था, अनुदान मर्यादा प्रकल्प किंमतीच्या ६०% व अधिकतम २.०० कोटी असेल. ही मर्यादा अनुदानावर आहे म्हणजेच प्रकल्पाची किंमत अधिक असली तरी अनुदान एवढेच मिळेल.

प्रश्न:-८) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये घटक प्रस्तावित करतानाचे प्रमाण काय आहे?

उत्तर:- सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये (१) पिक काढण्योत्तर पायाभुत सुविधासाठींच्या (Post Harvest Infrastructure) बाबींवर किमान प्रकल्प खर्चाच्या ७०% खर्च प्रस्तावित असावा. (Post- Harvest Infrastructure includes post-harvest machinery, primary Processing, cleaning, grading, secondary processing, tertiary processing, Packaging इ.) (२) गुणवत्तापुर्ण उत्पादनासाठीचे तंत्रज्ञान आणि अन्य पिक काढणीपुर्व सोयी सुविधांसाठी अधिकतम (उद: लागवडीसाठी औजारे व यंत्रे) एकुण प्रकल्प खर्चाचा २५% खर्च प्रस्तावित करता येईल. (३) प्रकल्प कार्यान्वयन खर्च ५% प्रस्तावित करता येईल.

प्रश्न:-९) उपप्रकल्प उभारणीसाठी किती जागा लागेल व उपप्रकल्प उभारणीच्या बाजूने किती जागा सोडावी लागेल?

उत्तर:- उपप्रकल्पामध्ये कोणते घटक प्रस्तावित केले आहेत त्याच्या क्षमतेनुसार व अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार तांत्रिकदृष्ट्या आवश्यक तेवढी जागा असावी. तसेच उपप्रकल्प उभारणीच्या बाजूने वाहतूक व इतर कामकाजाच्या दृष्टीने आवश्यक जागा सोडावी. काही ठिकाणी नगररचना विभागाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमानुसार जागा असावी.

प्रश्न:-१०) उपप्रकल्पासाठी कर्ज घेणे बंधनकारक आहे का? कर्ज आवश्यक असल्यास राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेणे आवश्यक आहे का? (राष्ट्रीयकृत/सहकारी/ पतसंस्था इ.)

उत्तर:- उपप्रकल्पासाठी कर्ज घेणे बंधनकारक नाही, संस्था स्वत:ही स्वहिस्सा उभारू शकतील. उपप्रकल्पासाठी कर्ज घेण्यासाठी कोणत्याही बँकेकडे (राष्ट्रीयकृत/सहकारी/ पतसंस्था इ.) प्रस्ताव सादर करु शकता. बँकांनी कर्ज मंजूर करून प्रत्यक्ष रक्कम मुक्त केल्यानंतर स्मार्ट प्रकल्पाचे अनुदान मिळणार आहे हे लक्षात घ्यावे. परंतु शक्यतो राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेतल्यास इतर बँकांच्या तुलनेत व्याज दर कमी असू शकतो.

प्रश्न:-११) एखाद्या सीबीओ कडे जुनी औजारे व यंत्रे असल्यास उपप्रकल्पामध्ये फक्त गोदाम घेता येईल का?

उत्तर:- होय, परंतु प्रकल्प आर्थिक व तांत्रिक निकषावर पात्र ठरला पाहिजे. उपप्रकल्पातून कोणती बाब घ्यावी हा CBO चा निर्णय असेल, प्रकल्प मंजूरीपूर्व खरेदी केलेल्या यंत्र सामुग्रीला आणि उभारलेल्या इमारतीला अनुदान मिळणार नाही. उपप्रकल्पासाठी आवश्यक असल्यास जास्तीत जास्त २००० मे.टन व त्यापेक्षा कमी क्षमतेचे गोदाम घेता येईल.

प्रश्न:-१२) सविस्तर प्रकल्प अहवालातील बांधकामाचे सनदी अभियंता यांचे कडून तयार केलेले अंदाजपत्रक जोडायचे की शासकीय यंत्रणेद्वारे घेतलेली तांत्रिक मंजूरी जोडायची?

उत्तर:- सविस्तर प्रकल्प अहवालातील बांधकामाचे किंमतीसाठी सनदी अभियंता यांचे कडून तयार केलेले अंदाजपत्रक चालेल. यास शासकीय यंत्रणेच्या स्वतंत्र तांत्रिक मान्यतेची आवश्यकता नाही.

प्रश्न:-१३) सविस्तर प्रकल्प अहवालास उपप्रकल्प उभारणीसाठी आवश्यक मशीनरी, यंत्रे, औजारे यासाठीचे सर्व कर व वाहतूक खर्चासह दरपत्रक जोडायचे का?

उत्तर:- होय.

प्रश्न :-१४) समुदाय आधारित संस्थेस मॅग्नेट प्रकल्पातून लाभ मंजूर असल्यास स्मार्ट प्रकल्पातून लाभ मंजूर असल्यास स्मार्ट प्रकल्पातून लाभ मिळेल का?

उत्तर :- इतर प्रकल्प / योजनेतून जे घटक मंजूर आहेत ते सोडून घटकांची मागणी असल्यास व्यवहार्यता तपासून लाभ मिळेल.

प्रश्न :-१५) मूल्यमापनाचे प्रपत्र -५ कोणी भरावयाचे आहे?

उत्तर :- प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यामार्फत मूल्यमापनाचे प्रपत्र भरण्यात येईल. समुदाय आधारित संस्थांनी सदर प्रपत्र भरण्याची आवश्यकता नाही.

प्रश्न :-१६) किमान पूर्तता करावयाचे निकष प्रपत्र-४ मधील प्रस्तावित व्यवसाय आराखड्यामधील Average Break Even टक्केवारी कमाल किती असावी?

उत्तर :- Average Break Even टक्केवारी कमाल ६०% असावी.

प्रश्न :-१७) सविस्तर प्रकल्प अहवाल मूल्यमापनाचे निकष प्रपत्र -५ मधील Break Even Percentage सुधारित गुणांकन किती आहे?

उत्तर :- ४०% पर्यंत सरासरी Break Even- ६ गुण

४१% ते ६०% पर्यंत सरासरी Break Even- ४ गुण

(दशरथ तांभाळे)
अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट

प्रकल्प समन्वय आणि अंमलबजावणी कक्ष, शेती महामंडळ भवन, 270, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे 411 016 (महाराष्ट्र)
दूरभाष: ०२०२५६५६५७७/८ वेबसाईट: www.smart-mh.org ईमेल: pcmu.smart@gmail.com